**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आगमन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ब्रुनेई आणि सिंगापूरच्या दौऱ्यावर
- वस्तू आणि सेवा कर संकलनात ऑगस्ट महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्के वाढ
- इस्त्राएलमधे युद्धविरामाच्या मागणीसाठी विविध संघटनांची निदर्शनं.
- पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या निषाद कुमारला उंच उडी स्पर्धेत रौप्यपदक, तर प्रीती पालला २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत कास्यपदक

**आणि**

- आंध्रप्रदेश, तेलंगण आणि महाराष्ट्रात जोरदार पावसामुळे पूरस्थिती/ बचावकार्य सुरु

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आल्या आहेत. दौऱ्याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच आज त्यांनी कोल्हापूर इथं महालक्ष्मीच्या मंदिरात दर्शन घेतलं. राष्ट्रपती मुर्मू आज वारणानगर इथं श्री वारणा महिला सहकारी गटाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. उद्या त्या पुण्यात सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या २१व्या दीक्षांत समारंभाला संबोधित करतील. तसंच महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमात भाग घेतील. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी लातूरच्या उदगीर इथं बुद्धविहाराचं उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. तसंच शासन

आपल्या दारी आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची भेटही राष्ट्रपती घेणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ब्रुनेई आणि सिंगापूरच्या दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे पूर्व विभागाचे सचिव जयदीप मजुमदार यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भारत ब्रुनेई राजनैतिक संबंधांना ४० वर्ष पूर्ण होत असताना हा दौरा होत असून ब्रुनेईला भेट देणारे मोदी हे पहिले भारतीय प्रधानमंत्री आहेत, असं ते म्हणाले. ब्रुनेईचा दौरा झाल्यानंतर प्रधानमंत्री सिंगापूरला जाणार आहेत. सिंगापूरच्या प्रधानमंत्र्यांच्या आमंत्रणावरुन ते तिथे जाणार असून या भेटीत अनेक महत्त्वाचे करार होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर संकलनात ऑगस्ट महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात एक कोटी ५९ लाख रुपये संकलन झालं होतं, तर यंदा ही रक्कम एक कोटी ७५ लाख रुपये असल्याचं सरकारी आकडेवारी दाखवते. जीएसटी अंतर्गत करदात्यांना परतावा देण्यापूर्वी केंद्र सरकारने ३० हजार ८६२ कोटी रुपये जमा केले, तर राज्यांनी ३८ हजार ४११ कोटी रुपये जमा केले आहेत. आयात आणि आंतरराज्य विक्रीवरच्या एकात्मिक वस्तू आणि सेवा कराचं संकलन ९३ हजार ६२१ कोटी रुपये इतकं होतं.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाचं सदस्यनोंदणी अभियान आजपासून सुरू होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पक्ष सदस्यत्वाच्या नूतनीकरणाचं प्रमाणपत्र प्रदान करुन पक्षाध्यक्ष जगत प्रकाश नड्डा आज अभियानाला प्रारंभ करतील. ही मोहीम येत्या १० नोव्हेंबरपर्यंत टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणार आहे. पहिला टप्पा येत्या २५

सप्टेंबरला संपेल. या अभियानाद्वारे देशभरातून किमान एक कोटी नवे सदस्य मिळवण्याचं उद्दिष्ट असल्याचं पक्षसूत्रांनी सांगितलं. मात्र ज्या राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत तिथं अभियान राबवलं जाणार नाही.

<><><><>

पारलिंगी समुदायासंबंधीची धोरणं सर्वसमावेशक आणि प्रभावी असावी या दृष्टीनं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागानं संबंधितांकडून तसंच सामान्य नागरिकांकडूनही मोठ्या प्रमाणावर सूचना मागवल्या आहेत. पारलिंगी समाजासाठी सरकारनं अनेक उपाययोजना केल्या आहेत. पारलिंगी समुदायाच्या हितरक्षणासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारांकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची तपासणी आणि शिफारशी सादर करण्यासाठी म्हणून मंत्रालय सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन झाली आहे.

<><><><>

इस्रायलमधे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी हमासशी युद्धविरामाबाबत चर्चा करावी आणि गाझामध्ये ठेवलेल्या ओलीसांची सुटका करावी, ही मागणी जोर धरत आहे. हमासने ओलीस ठेवलेल्यांपैकी सहा जणांचे मृतदेह सापडल्याचं इस्रायलच्या संरक्षण दलांनी जाहीर केल्यानंतर काल या मागणीसाठी देशभरात निदर्शनं सुरू झाली आणि रात्रभर सुरू राहिली. या मागणीच्या समर्थनार्थ देशभरातल्या विविध आस्थापना बंद राहिल्याचं वृत्त स्थानिक माध्यमांनी दिलं आहे. कामगार संघटनांनीही आज एक दिवसाचा देशव्यापी बंद पुकारला आहे.

<><><><>

मणिपूरमध्ये कुकी अतिरेक्यांनी इम्फाळ वेस्ट जिल्ह्यातल्या कौत्रुक या गावावर काल केलेल्या हल्ल्यात दोन जण ठार झाले, तर तीन जण जखमी झाले. मृतांमधे एका महिलेचा समावेश असून तिची आठ वर्षांची मुलगी जखमी झाली आहे. दोन पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत. निःशस्त्र गावकऱ्यांवर कुकी अतिरेक्यांनी

केलेला हा हल्ला म्हणजे राज्यात शांतता प्रस्थापित करण्याच्या सरकारचे प्रयत्न अयशस्वी करण्याचा प्रयत्न असल्याचं गृह विभागानं म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस ग्रँडस्लॅम स्पर्धेत पुरुष दुहेरीतलं भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे. रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एब्देन या जोडीला काल तिसऱ्या फेरीत मॅक्सिमो गोन्झालेस आणि आंद्रेस मोल्टेनी या अर्जेंटिनाच्या जोडीकडून १-६, ५-७ असा थेट सेट्समध्ये पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीत मात्र रोहन बोपण्णा आणि त्याची इंडोनेशियाची साथीदार ॲल्डिला सुत्जियादी या जोडीचं स्पर्धेतलं आव्हान कायम आहे.

<><><><><>

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताची धावपटू प्रीती पाल हिनं महिलांच्या २०० मीटर स्पर्धेत कास्यपदकाला गवसणी घातली आहे. या स्पर्धेतलं तिचं हे दुसरं पदक आहे. पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत निषाद कुमारने रौप्यपदकावर नाव कोरलं आहे. स्पर्धेच्या आजच्या पाचव्या दिवशी पदकतालिकेत आणखी भर पडण्याची आशा आहे. तिरंदाज शीतल देवी आणि राकेश कुमार, धावपटू दीप्ती जीवनजी, भालाफेकपटू सुमित अंतिल, थाळीफेकपटू योगेश कथुनिया यांच्याकडून उत्तम कामगिरीची अपेक्षा आहे. बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताला पदकं मिळण्याची आशा आहे. पुरुष एकेरीत सुहास यतिराजनं देशबंधू सुकांत कदमला हरवून अंतिम फेरी गाठली आहे. महिला एकेरीत तुलसीमती मृगेशन आज सुवर्णपदकासाठी चीनच्या प्रतिस्पर्ध्याशी लढत देईल, तर मनीषासमोर कास्यपदकासाठी डेन्मार्कच्या बॅडमिंटनपटूचं आव्हान असेल. भारतानं या स्पर्धेत आत्तापर्यंत सात पदकं पटकावली आहेत. यात एक सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कास्यपदकांचा समावेश आहे.

<><><><><>

देशाच्या विविध भागात पावसाचा जोर असून ठिकठिकाणी नद्यांचे प्रवाह फुगले आहेत. **तेलंगण, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रात** अनेक जिल्ह्यांना पुराचा फटका बसला आहे. परभणी जिल्ह्यात करापरा नदीला पूर आल्याने जिंतूर तालुक्यातल्या अनेक गावांना पुराचा वेढा बसला आहे. अनेक घरांमध्ये पाणी आल्याने जनजीवन विस्कळित झालं असून ,सोयाबीन कापूस पिकात पाणी साचल्याने नुकसान झालं आहे. **परभणी - जिंतूर** महामार्गावरची वाहतूक बंद झाली आहे. सेलू इथं पूरस्थिती निर्माण झाली असून उपायुक्तांनी लष्कराला मदतीसाठी पाचारण केलं आहे. ६० सैनिक आणि वैद्यकीय पथकं बचावकार्य करत आहेत. **हिंगोली** जिल्ह्यातही अनेक गावांना पुराचा वेढा बसला असून जनजीवन विस्कळीत झाली आहे. **बीड** जिल्ह्यातल्या १० तालुक्यातल्या ६१ मंडळांमधे अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

**आंध्र प्रदेशात** राज्य सरकार युद्धपातळीवर मदत आणि बचाव कार्य करत आहे. विजयवाडा जिल्ह्यात पुरामुळे बुडामेरू ओढ्याला तडा गेल्यानं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी पूरग्रस्त भागाला भेट देऊन नागरिकांना अन्न, पाणी आणि आवश्यक औषधांचा व्यवस्थित पुरवठा करावा असे आदेश अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशीही चर्चा केली. विजयवाड्यात मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाची ६ पथकं, ४० बोटी आणि ६ हेलिकॉप्टर्स पाठवली जातील, **असं शहा यांनी नायडू यांनी नायडू यांना सांगितलं**. दरम्यान पूरस्थितीमुळं राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना आज सुटी देण्यात आली आहे.

**तेलंगणमध्ये खम्माम, महबूबाबाद आणि सूर्यापेट** जिल्ह्यांना अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसला आहे. या जिल्ह्यांमधल्या शेकडो गावांना पुराच्या पाण्यानं वेढलं आहे. हजारो नागरिक टेकड्यांवर, घरांच्या छतांवर आणि महामार्गांवर अडकून पडले आहेत. मदत आणि बचाव कार्यासाठी राज्यात एनडीआरएफची ९

पथकं तैनात करण्यात आली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल आंध्र प्रदेश आणि तेलंगण राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दूरध्वनी करुन तिथल्या पूरस्थितीचा आढावा घेतला. दोन्ही राज्यांना शक्य ती सर्व मत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**//<><><><><>//**